Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 47100)

ISSN 2279 - 0489
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Volume - XI, Issue-II
February - July - 2023
English Part - I /
Marathi Part - III /
Hindi

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.538
www.sjifactor.com




Ajanta
Prakashan

VOLUME - XI, ISSUE - II - FEBRUARY - JULY - 2023
GENIUS - ISSN - 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 6.538 (www.sjifactor.com)


# ११. पंडिता रमाबाईंचा ख्रिश्चन धर्मांगिकार आणि वृत्तपत्रिय टीकेचे आव्हान

डॉ. संदीप संभाजी तारदाळकर
इतिहास विभागप्रमुख, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

सामाजिक–धर्मिक रुढी परंपरांमध्ये हस्तक्षेप करुन, त्यांत बदल घडवुन समाजसुधारणा करु पहात असणाऱ्या व्यक्तींना परंपरावादी लोकांच्या रोषास सामोरे जावे लागते. पंडिता रमाबाई सुद्धा याला अपवाद नव्हत्या. पंडिता रमाबाई या स्वतः स्त्री असूनही संस्कृत पारंगत होत्या आणि त्यांनी जीवनभर परितक्त्या स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. तो काळ पाहता स्त्री सुधारणांबाबत समाज प्रतिकुलच होता. त्यामुळे पंडिता रमाबाईंना सतत पुराणमतवाद्यांच्या रोषास सामोरे जावे लागले. हा रोष प्रामुख्याने रमाबाईंच्या ख्रिस्ती धर्म स्विकारावर होता. याबाबतीतील पंडिता रमाबाईंवरील रोष प्रामुख्याने वर्तमानपत्रांतून प्रतीत होतो. या शोधनिबंधात पंडिता रमाबाईंवर वर्तमानपत्रांतून– त्यातही प्रामुख्याने 'केसरी' मधुन जी टीका झाली आणि पंडिता रमाबाईंनी त्याला सामोरे जात आपले कार्य पुढे चालू ठेवण्याचे जे प्रयत्न केले याचा आढावा घेतला आहे.

### रमाबाईंचे प्रारंभिक जीवन

23 एप्रिल 1858 रोजी मंगरुळजवळील गंगामूळ या डोंगरावर रमाबाई यांचा जन्म झाला. चित्पावन ब्राह्मण कुळातील डोंगरे नावाच्या कुळातील अनंतषास्त्री व लक्ष्मीबाई हे त्यांचे आई–वडिल होत. परिस्थितीमुळे अनंतषास्त्री यांना गाव सोडावे लागले आणि पत्नी व अपत्यांसह संपूर्ण भारतभर तीर्थयात्रा करावी लागली. अनंतषास्त्री व लक्ष्मीबाई हे दोघेही संस्कृत पारंगत होते. त्यांनी रमाबाईंनाही संस्कृत षिकविले होते. रमाबाईंचे वैयक्तिक आयुष्य अतिषय खडतर गेले. रमाबाई 22 वर्षांच्या होईपर्यंतच आई–वडिल व सर्व भावंडे निवर्तले. 1880 मध्ये रमाबाईंनी बाबू बिपिन बिहारीदास मेधावी या शुद्र जातीतील बंगाली व्यक्तिसोबत आंतरजातिय विवाह केला.[1] या प्रतिलोम विवाहातून रमाबाईंची सामाजिक चालीरितींबाबतची स्वतंत्र प्रज्ञा दिसून येते. मात्र, विवाहानंतर 19 महिन्यांतच त्यांच्या पतीचे निधन झाले. या विवाहातून रमाबाईंना एक कन्या झाली. तिचे नाव मनोरमा ठेवण्यात आले.

यानंतर रमाबाई बंगालमधून महाराष्ट्रात परतल्या व त्यांनी 'आर्य महिला समाज' या संस्थेची स्थापना केली. तसेच हंटर कमिषन समोर साक्ष देउन स्त्रीषिक्षणाचा पुरस्कार केला. इंग्रजीचा अभ्यास करण्याच्या ओढीने त्या 1883 मध्ये इंग्लंडला गेल्या. तेथुन त्या अमेरिकेला गेल्या. अमेरिकेतील स्त्रीयांची प्रगती व विषेषतः तेथील षिक्षणपद्धती पाहून रमाबाईंचे मन तेथे रमले. भारतात परत आल्यावर येथील अज्ञ बालविधवांसाठी त्याच धर्तीवर आपणही एक संस्था काढायची असा संकल्प त्यांनी याचवेळी केला.[2]

### रमाबाईंचा धर्मांगिकार

कलकत्त्यात 'स्त्री–धर्मनीती' या विषयावर व्याख्यान देण्यापूर्वी धर्मषास्त्रांचा रमाबाईंनी अभ्यास केला होता.[3] स्त्रीला मोक्षप्राप्ती नाही, ती अत्यंत वाईट आणि अपवित्र आहे, पती हाच तीचा परमेष्वर, तीर्थस्थानी पैषांच्या बदल्यात स्वर्गात जाण्याची व्यवस्था, देवदासींची प्रथा, या गोष्टींमुळे, तसेच ब्राह्मण–अब्राह्मण भेद पाहून, तीर्थक्षेत्री आणि

आई–वडिल वारल्यानंतर आलेल्या अनुभवांवरुनही रमाबाईंचे मन 'धर्म' या गोष्टीला विटले होते. तसेच इतर विषयांबरोबर बायबलचा अभ्यास करताना ख्रिस्ती धर्माकडे त्यांचा कल झुकू लागला होता. सहा वर्षांच्या बायबलच्या अभ्यासानंतर त्यांनी ख्रिस्ती धर्म स्विकाराचा निर्णय घेतला. वॉन्टेज इथल्या चर्चमध्ये कॅनन बटलर यांच्या हस्ते रमाबाईंनी मनोरमासह 29 सप्टेंबर 1883 रोजी बाप्तिस्मा घेतला.[4] रमाबाईंनी हा जो धर्मांगिकार केला त्यामुळे पुढील आयुष्यात त्यांना मोठ्या टिकेला सामोरे जावे लागले.

रमाबाईंच्या ख्रिष्चन धर्मांगिकारानंतर 'केसरी'ने सुरुवातीला व्यक्त केलेली प्रतिक्रीया सौम्य होती. "पंडिताबाईंनी धर्मांतर केले हे आमचे दुर्दैव होय. तथापी तेवढ्याच कारणासाठी आम्ही त्यांस टाकून द्यावे हे उचित होणार नाही. ..... ख्रिस्ती धर्मप्रसारार्थ त्यांनी आपला प्रयत्न चालविला नाही असे आतापर्यंतच्या त्यांच्या वर्तनावरुन व लोकांपुढे त्यांनी दर्षविलेल्या विचारांवरुन उघड होत आहे." असे मत त्यावेळी केसरीतून मांडण्यात आले होते.[5]

मात्र, 'इंदुप्रकाष'मध्ये या धर्मांतराबाबत कडवट प्रतिक्रीया उमटली. "...... हिने आपल्या अंगच्या अल्प विद्येने आमच्या या प्रांतातल्या पुष्कळ समंजस लोकांस देखिल थक्क करुन सोडले आणि शेवटी फसविले."[6] अषी प्रतिक्रीया 11 नोव्हेंबर 1883 च्या इंदुप्रकाषच्या अंकात व्यक्त करण्यात आली होती.

**शारदासदनच्या कार्यावर घेतलेले आक्षेप**

पंडिता रमाबाईंच्या ख्रिष्चन धर्मांगिकारावर झालेली टीका तेवढ्यापुरती मर्यादित राहीली नाही. या पुढे त्यांच्या प्रत्येक कार्याबाबतीत वर्तमानपत्रातून संषय घेतला जाऊ लागला. पंडिता रमाबाईंच्या विचारांमुळे प्रभावित होऊन अमेरिकन लोकांनी 'रमाबाई असोषिएषन' स्थापन केली होती. या संस्थेमार्फत रमाबाईंच्या भारतातील स्त्रीउद्धाराच्या कार्याला पुढील दहा वर्षे आर्थिक सहाय्य करण्याचे ठरविले होते. अषारितीने ख्रिष्चन लोकांनी मदत केल्यामुळे व रमाबाईंच्या ख्रिस्ती धर्म स्विकारामुळे त्यांची शारदासदन ही संस्था कायम संषयाच्या सावटाखाली राहीली.

11 मार्च 1889 रोजी मुंबई येथे पंडिता रमाबाईंनी 'षारदासदन' नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेच्या उद्देषपत्रिकेत असे लिहीले होते की, 'षाळेत प्रथम निराश्रित उच्च वर्गातील विधवा व इतर निराश्रित उच्च वर्गातील स्त्रिया यांची सोय करून, मग सवड राहिल्यास इतरांस घेतले जाईल.'[7]

21 डिसेंबर 1889च्या 'ख्रिष्चन वुइकली' या न्युयॉर्क येथिल वर्तमानपत्रात, "शारदासदनात हल्ली सात बालविधवा विद्यार्थीनी आहेत. त्यांपैकी दोघींनी आपली ख्रिस्ती धर्मावरील प्रीती व्यक्त केली आहे" असा मजकूर छापून आला.[8] त्याचा संदर्भ देऊन केसरीने, "शाळा व्यावहारिक षिक्षणाकरीता आहे धर्मषिक्षणाकरीता नाही हे खरे, तरी प्रत्येक विषयांत धर्म विचार जर वेळी अवेळी इकडून तिकडून घुसू लागतील तर त्यांचा ठराविक परिणाम व्हावयचाच. म्हणून शाळेत स्त्रिया पाठवणारांनी, त्या ख्रिस्ती होणे जर त्यांना खपत नसेल तर या माहितीचा खुलासा करुन घ्यावा"[9] अषी लोकांना स्पष्ट सूचना दिली होती. तसेच, पुढील काही लेखांत, 'षारदासदनाची उद्देषपत्रिका खरी, तर मुली ख्रिस्ती धर्माकडे कषा वळतात?' असा प्रष्न उपस्थित केला. त्यामुळे शारदासदन ही ख्रिस्ती संस्था आहे असा आक्षेप संस्थेवर घेण्यात येऊ लागला.

या आक्षेपांना पंडिता रमाबाईंनी 2 फेब्रुवारी 1890 रोजी केसरीत पत्र पाठवून उत्तर दिले. त्यात त्या लिहीतात, "आम्ही षिक्षणात अगर खाजगी भाषणांत आमची धर्ममते जोराने मांडित नाही. उलट एका मुलीच्या

आईबापांनी आपली अज्ञान मुलगी ख्रिस्ती होण्याकरिता माझ्या स्वाधिन केली तरी ती अज्ञान म्हणून मी तिला शिक्षा दिली नाही. शाळेतील कोणी मुली सोवळे, उपवास, तुळशीपूजा वगैरे करितात त्यास आम्ही हरकत करीत नाही. इतक्याही उपर तुम्ही विशेष उपाय सुचवा ते आम्ही योजू."[10]

शारदासदन ही ख्रिस्ती संस्था आहे या आक्षेपाला उत्तर देताना त्या लिहितात, 'आमच्या देशबांधवांनी आम्हांस योग्य आश्रय व उत्तेजन दिले असते तर शारदासदन ही ख्रिस्ती संस्था होण्याची काहीच जरूरी नव्हती. हिंदूलोक असली शाळा चालण्याकरीता पैसे देईनात म्हणून मी ख्रिस्ती लोकांपाशी भिक्षा मागितली. तुम्ही खर्च द्या, हवे ते शिक्षक नेमा, एखाद्या हिंदू बाईला शाळेची मुख्य करा, तसे झाले तरी मूळ हेतूस अनुसरून आम्ही ख्रिस्ती लोक तुम्हास मदत करू.'[11]

शारदासदनावरील केसरीमधील टिकेस न्या. म. गो. रानडे यांनीही उत्तर दिले. ते शारदासदनाच्या सल्लागार समितीचे सदस्य होते. ते म्हणतात, 'स्त्रियांची शाळा मिशनरी लोकांची असली म्हणून काय झाले, त्यापासून काहितरी आपला फायदा होणारच. पंडिता रमाबाईंनी धर्मांतर केले म्हणून आमच्या स्त्रियांस शिकविण्यास त्यांस काय हरकत आहे. आपण बरे तेवढे घ्यावे वाईट तेवढे सोडून द्यावे.'[12] यांवर टिका करून केसरी म्हणतो, 'अशा सल्लागारांच्या नावावर लोकांस फसविण्याचा दोष बसेल. स्त्रिशिक्षणाचे पांघरूण घेऊन आमच्यात घुसू पाहणाऱ्या ख्रिस्ती बाया व त्यांस सहाय्य करणारे व्यवस्थापक – मग ते कितीही विद्वान अगर राजविभूषित असोत – त्यांस आम्ही आपल्या समाजाचे, हिंदूत्वाचे आणि स्त्री शिक्षणाचे सुद्धा शत्रूच समजतो.'[13]

23 जून 1890च्या केसरीत, 'शारदासदन व रानडे यांची मध्यस्थी' या मथळ्याखाली आणखी आक्षेप नोंदविण्यात आले होते. 'पंडितेसारख्या उच्छृंखल आधुनिक कामंदकीच्या कृतीस आळा घालणे म्हणजे वाऱ्याची मोट होय. त्या आपल्यास हवी तशी व्यवस्था ठेवणार, वाटेल तर त्या तुळशीवृंदावनही उखडून देणार! व तें नको म्हणण्यास रानड्यांना अधिकार नाही. तात्पर्य, रानडे हे स्वतः फसून दुसऱ्यांनाही फसविण्यास कारण होत आहेत.'[14]

याशिवाय रमाबाईंची सख्खी आत्येबहीण कृष्णाबाईचे पत्र प्रसिद्ध करून, रमाबाईंच्या भाषणातील काही वाक्ये उद्धृत करून केसरीने सातत्याने शारदासदनात ख्रिस्ती धर्मप्रसाराचे कार्य चालविले जाते असा आरोप केला. त्याचा दबाव शारदासदनाच्या सल्लागार मंडळावर झाला आणि 1893 मध्ये रानडे, भांडारकर यांनी सल्लागार मंडळाचा राजीनामा दिला.[15]

केसरीप्रमाणेच मराठा, शिवाजी, पुणे वैभव, ज्ञानप्रकाश वगैरे वर्तमानपत्रांतूनही रमाबाईंच्या कार्यावर 'संशय व्यक्त करण्यात आला. पुणे वैभवने तर केसरीतील मजकूरावर आधारित अत्यंत शेलक्या शब्दांत रमाबाईविरोधात मोहीम चालविली. तेव्हा एका टीकेसंदर्भात रमाबाईंनी पुणे वैभवविरुद्ध फिर्याद दाखल करून त्यांना माफी मागावयास भाग पाडले होते.[16] पुढील काळांत केसरीमध्येही रमाबाईंवर शेलक्या शब्दांत टीका होऊ लागली. उदा. 12 जानेवारी 1904च्या अग्रलेखात रमाबाई या 'मायावी वाघीण' आहेत, त्यांचे 'संस्कृतचे ज्ञान तुटपुंजे' आहे, 'पांडित्य पांचटलेले' आहे, 'पंडिता ऐवजी त्यांनी आता रेव्हरंड लावावे'– अशाप्रकारची वाक्ये वापरलेली आहेत.[17]

पुढे रमाबाईंनी दुसऱ्यांदा अमेरिकेचा दौरा केला व तेथुन वर्गणी मिळविण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांनी एक निबंध लिहीला. त्यांत त्यांनी वेदांतावर व हिंदु समाजस्थितीवर टीका केली होती. या टीकेला केसरीतून उत्तर देण्यात

आले होते. यावेळी, "हाती मिळालेल्या तीनषे मुली व विधवांपैकी पावणे तीनषे मी ख्रिस्ती केल्या असे बाईंनी या निबंधात लिहीले आहे. पण शारदासदनच्या किल्ल्यात कोंडलेल्या तीनषे अनाथ स्त्रीयांपैकी 25 तरी स्वधर्मात रहाव्या हेच आष्चर्य होय !"[18] अषी उपरोधिक टीका केसरीतून करण्यात आली होती.

## समारोप

प्रामुख्याने केसरीतुन आणि इतर वर्तमानपत्रांतून पंडिता रमाबाई व त्यांनी चालवलेली शारदासदन ही संस्था यांवर जी टीका करण्यात आली, त्यामुळे रमाबाई यांच्या कार्यावर विपरीत परिणाम झाला. रमाबाईंनी शारदासदनमध्ये येणाऱ्या कोणत्याही स्त्रीवर किंवा मुलीवर ख्रिस्ती धर्म स्विकारण्याची सक्ती केली नाही. मात्र, त्यांनी या स्त्रीयांना धार्मिक स्वातंत्र्य दिले. त्यामुळे सदनातील काही स्त्रीया स्वतःहून ख्रिष्चन झाल्या. पण या उदाहरणांवरून केसरीसारख्या वर्तमानपत्रांनी त्यांच्या संपूर्ण कार्यावर सातत्याने प्रष्नचिन्ह उपस्थित केले.

याचा परिणाम म्हणुन शारदासदनच्या सल्लागार मंडळातील रानडे, भांडारकर यांच्या सारख्या समाजसुधारकांनी राजिनामे दिले. त्यामुळे रमाबाई स्त्री उद्धाराच्या कार्यात एकाकी पडल्या. या वृत्तपत्रीय टीकेमुळे जे जनमानस तयार झाले त्यांमुळे सामान्य हिंदूजनांनीही रमाबाईंच्या कार्याला हाथभार लावला नाही. परिणामी रमाबाईंना आपली संस्था चालविण्यासाठी अमेरिकेतील लोकांकडून मदत मिळवावी लागली. पण त्यामुळे त्यांच्यावरील ख्रिस्ती धर्मप्रसार करीत असल्याचा आरोप आणखीणच बळकट झाला.

तसेच, सामान्य हिंदूजनांनी आर्थिक मदत तर केली नाहीच, उलट ख्रिस्ती धर्मांतराच्या भितीने आपल्या घरातील विधवांना शारदासदनमध्ये पाठविण्यात हाथ आखडता घेतला. काहींनी आपल्या घरातील स्त्रीयांना शारदासदनमधून काढून घरी नेले. उदा. 1893 मध्ये हिंदु–मुसलमान दंग्यामुळे मुली घरोघरी पोहोचविण्यात आल्या, तेव्हा वरील परिस्थीती लक्षात घेऊन या मुलींच्या पालकांनी त्यांना पुन्हा शारदासदनात पाठविले नाही.[19] याप्रकारच्या तकारींमुळेच 1903 मध्ये कलेक्टर स्विफ्ट यांनी शारदासदनची चौकषी केली.[20] या सर्व परिस्थीतीमुळेच रमाबाईंनी शारदासदनचा मुक्काम पुण्यातुन केडगावास नेला आणि याठिकाणी आपले कार्य पुढे चालू ठेवले.

## संदर्भ

1. टिळक देवदत्त नारायण, 'महाराष्ट्राची तेजस्विनी पंडिता रमाबाई', नागरिक प्रकाषन, नाषिक, 1960, पृष्ठ 3.
2. कित्ता, पृष्ठ 6.
3. उजगरे अनुपमा, 'भारतीय साहित्याचे निर्माते पंडिता रमाबाई', साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, 2011, पृष्ठ 27.
4. कित्ता.
5. कित्ता, पृष्ठ 28.
6. कित्ता.
7. केळकर नरसिंह चिंतामण, 'लो. टिळक यांचे चरित्र, पूर्वार्ध – खंड 1', रिया पब्लिकेषन्स, कोल्हापूर, 2012, पृष्ठ 323.
8. कित्ता.

9. कित्ता, पृष्ठ 324.

10. कित्ता.

11. कित्ता.

12. कित्ता.

13. कित्ता.

14. कित्ता.

15. कित्ता, पृष्ठ 331.

16. उजगरे अनुपमा, उपरोक्त, पृष्ठ 28.

17. कित्ता.

18. केळकर नरसिंह चिंतामण, 'लो. टिळक यांचे चरित्र, उत्तरार्ध – खंड 2', रिया पब्लिकेषन्स, कोल्हापूर, 2012, पृष्ठ 25.

19. केळकर नरसिंह चिंतामण, उपरोक्त, खंड 1, पृष्ठ 331.

20. केळकर नरसिंह चिंतामण, उपरोक्त, खंड 2, पृष्ठ 26.